## नियमित दिवाणी दावा क्र.५४/२०२० मधील निशाणी ३१ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांना दिनांक २८.०१.२०२२ रोजी समन्सची बजावणी झाली आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१ ते ४ हे मागील ब–याच वर्षांपासून पैठण, ता.पैठण, जि.औरंगाबाद येथे राहत आहेत. प्रतिवादी क्र.१ हिचे पती मयत झाल्यामुळे ती माहेरी पैठण येथे मोलमजुरी करून अज्ञान प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचा उदरनिर्वाह करते. त्याकरीता ती कायम मजुरीसाठी बाहेरगावी गेली होती. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना या कामी नेमले तारखेस हजर होवून विहित मुदतीत त्यांची कैफियत दाखल करता आली नाही. त्या कारणाने त्यांचेविरूध्द दिनांक २३.०६.२०२२ रोजी दावा एकतर्फा चालविण्याबाबत आदेश झाला आहे. तो आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी केली आहे. वादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, प्रतिवादी क्र.१ यांनी या अर्जाच्या पृष्ठयर्थ शपथपत्र सादर करुन ही कथने शपथेवर कथन केली आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा मालकी हक्क जाहीर होवून मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणेसाठी त्यांना या कामी हजर होणेस व त्यांची कैफियत सादर करणेस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## आ दे श

१. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरुध्द दिनांक २३.०६.२०२२ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द करणेत येत आहे आणि त्यांना या कामी हजर होणेस व त्यांची कैफियत अभिलेखात दाखल करणेस परवानगी देण्यात येत आहे.

–

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2023.07.12 11:10:32 +0530

**दिनांक : ११.०७.२०२३** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण : वडवणी** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, वडवणी, ता.वडवणी,जि.बीड.**

## Certificate

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/order.

Sd/-
(Amol D. Mule)
Stenographer (Grade-3)
Civil Court Junior Division
Wadwani

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 11.07.2023 |
| Transcribed on | : | 11.07.2023 |
| Checked and signed on | : | 12.07.2023 |